# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

क्र.मऔविम/भूविभाग/म.व्य.(भूमी)/ E55105 दिनांक : 26.11.2021

## परिपत्रक

**विषय :- कोरोना विषाणू(Covid-१९)जागतिक संसर्गजन्य साथीच्या पार्श्वभूमीवर,IT / ITES, Nano Technology, Bio-Tech, Robotics, Industries-४.०, IIT Township, Data Center तसेच इतर महत्वपूर्ण प्रकल्पांच्या पुनरुज्जीवनासाठी योजना ....**

**संदर्भ :-१)परिपत्रक क्र.मऔविम/भूविभाग/म.व्य.(भूमी)/सी ३९४५७ दि. २४.०५.२०२१.**

महामंडळाचे विविध औद्योगिक क्षेत्रामध्ये महामंडळाने विविध उद्योगांसाठी भूखंडाचे वाटप केलेले आहे. एमएमआर, पीएमआर, औरंगाबाद, नाशिक व नागपूर औद्योगिक क्षेत्रात वाटप केलेल्या काही भूखंडावर न्यायालयीन बाबी, उद्योग अवसानयात जाणे, आर्थिक मंदी इत्यादीमुळे उद्योग बंद पडलेले आहेत. त्यामुळे असे बहुतांशी बंद उद्योगकडील जागा तसेच उद्योजकांने विकास न केलेल्या जागा हया विनावापर पडून राहिल्यामुळे एक प्रकारे महामंडळाचा व महाराष्ट्र शासनाचे नुकसान तसेच रोजगार निर्मीती थांबलेली आहे.

कोव्हिड-१९ चा प्रादुर्भाव विचारात घेता मोठया उद्योजकांना आकर्षित करण्याकरीता त्यांना चटई निर्देशांक वापर करण्यास कालावधी वाढवून देणे तसेच ज्या भूखंडामधील हस्तांतरीत कंपनीची गुंतवणूक ५००० कोटी व त्यापेक्षा जास्त असेल अशा हस्तांतरण करुन घेणा-या कंपनीस भूखंड अनऔपचारीक हस्तांतरण प्रकरणात वापरलेल्या चटई निर्देशकानुसार(FSI) हस्तांतरण शुल्कात सूट देणे. नवीन उद्योगांची जागेची मागणी असून सुध्दा महामंडळामार्फत जागा उपलब्ध करुन देता येऊ शकत नाही.

या पार्श्वभूमीवर वरीलप्रमाणे बंद पडलेले उद्योग, अवसानयात गेलेले उद्योग तसेच काही कारणास्तव जे उद्योग सुरु नाहीत. अशा २०००० चौ.मी. जागेवरील उद्योगाचे हस्तांतर जे उद्योजक ५०० कोटी गुंतवणूक करु इच्छितात त्यांना IT/ITES, Nano Technology, Bio-Tech, Robotics, Industries-४.०, IIT Township, Data Center, तसेच इतर महत्वपूर्ण प्रकल्पांकरीता करण्यात यावी जेणेकरुन महाराष्ट्रामध्ये आर्थिक गुंतवणूक तसेच रोजगार निर्मीती होऊ शकेल.

सदरची प्रक्रीया सुलभ होणेकरीता महामंडळामार्फत फक्त अशा प्रयोजनाकरीता जागेची मागणी केल्यास अशा बंद असलेल्या उद्योगांची जागा हि प्रचलित भूखंड वाटपाचे धोरणानुसार हस्तांतर शुल्क वसूल करुन हस्तांतर करण्यास मान्यता देणे उचित होईल. त्याचप्रमाणे ज्या भूखंडधारकांने अद्यापपर्यंत इमारत पूर्णत्वाचा दाखला प्राप्त केलेला नाही. तसेच भूखंडावर सद्यःस्थितीत अर्धवट बांधकाम आहे किंवा भूखंड रिकामा आहे. अथवा बांधकाम पूर्ण होऊन उत्पादन बंद आहे. अशा भूखंडाचे हस्तांतरण IT / ITES, Nano Technology, Bio-Tech, Robotics, Industries-४.०, IIT Township, Data Center तसेच इतर महत्वपूर्ण प्रकल्प ईत्यादी उद्योगाकरीता करणार असेल तर अशा भूखंडास लागू असलेल्या मुदतवाढीच्या रक्कमेवर सवलत देणेत यावी तसेच महामंडळाच्या दिनांक २७.११.२०१९ च्या परिपत्रकानुसार माहिती तंत्रज्ञान



For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत धोरण २०१५ च्या धर्तीवर सूक्ष्म व लघू उद्योजकांना गाळे/ Flatted Gala बांधण्यास विनाशुल्क परवानगी देणे तसेच कोव्हिड-१९ चा प्रादुर्भाव विचारात घेता मोठया उद्योजकांना आकर्षित करण्याकरीता त्यांना चटई निर्देश वापर करणे, हस्तांतरण दरात सूट देणे इत्यादि विषयाबाबत संचालक मंडळाच्या दिनांक १६.१०.२०२० रोजी झालेल्या ३८७ व्या बैठकीत सविस्तर चर्चा होवून ठराव क्र. ६१२६ पारीत करण्यात आला.

महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठक क्र. ३८७ दिनांक १६.१०.२०२० रोजीच्या बैठकीतील पारित ठराव क्र. ६१२६ नुसार परिपत्रक क्र. डी-२६६०५ दिनांक १०.१२.२०२० अन्वये धोरण निर्गमित केले आहे. तथापि सदरहू ठराव बैठक क्र. ३८७ च्या इतिवृतांस पृष्टी देतांना ठराव क्र. ६१३८ अन्वये सुधारणा करण्यात आली असून त्यानुसार परिपत्रक क्र. मऔविम/म.व्य.(भूमी)/एट९०१९, दिनांक १६.०३.२०२१ अन्वये सुधारणा करणेत आलेली आहे. तसेच दिनांक २९.०४.२०२१ रोजी झालेल्या ३८९ व्या बैठकीतील पारीत ठराव क्र. ६२१९ नुसार सदरहू योजनेचा कालावधी वाढविण्यात आला आहे.

उपरोक्त पारीत ठरावांनुसार कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर न्यायालयीन बाबी, उद्योग अवसानयात जाणे, अर्थिक मंदी इत्यादीमुळे महाराष्ट्रात उद्योग बंद पडलेले आहेत किंवा काही कारणास्तव जे उद्योजक उद्योग सुरु करु शकले नाहीत अशा २०००० चौ.मी. व त्यावरील क्षेत्राच्या भूखंडधारकांना त्यांचे भूखंड जे उद्योजक ५०० कोटी व त्यापेक्षा जास्त गुंतवणूक करु इच्छितात त्यांना IT / ITES, Nano Technology, Bio-Tech, Robotics, Industries-४.०, IIT Township, Data Center तसेच इतर महत्वपूर्ण प्रकल्प या प्रयोजनाकरीता हस्तांतरण करण्याकरीता प्रस्तुत प्रकरणी उद्योजकांना परिपत्रक अवगत होणे, कागदपत्रे सादर करणे त्याची छाननी होणे याकरीता लागणारा कालावधी विचारात घेता तसेच कोव्हिड-१९ च्या महामारीचा उद्योगावर झालेला परिणाम विचारात घेता प्रकरणी सदरहू योजनेचा कालावधी वाढविण्याबाबत विषय संचालक मंडळाच्या दिनांक ०९.०८.२०२१ रोजीच्या ३९० व्या बैठकीत सादर करण्यात आला. प्रकरणी सविस्तर चर्चा होऊन ठराव क्र. ६३२४ पारीत करण्यात आला. प्रकरणी यापूर्वी **निर्गमित केलेले संदर्भिय परिपत्रक रद्द करण्यात येत असून** खालीलप्रमाणे पारीत ठरावानुसार सुधारित पुनर्जीवन योजना (Revival Scheme) निर्गमित करण्यात येत आहे.

१) ज्या भूखंडाचे IT / ITES, Nano Technology, Bio-Tech, Robotics, Industries-४.०, IIT Township, Data Center तसेच इतर महत्वपूर्ण प्रकल्प या प्रयोजनाकरीता हस्तांतरण होणार आहे. अशा भूखंडाचे हस्तांतरण करताना जर सदरहू भूखंडास मुदतवाढ शुल्क लागू असल्यास त्यास मुदतवाढीसाठी देय असणा-या एकूण मुदतवाढ शुल्काच्या एकूण ३० टक्के आकारणी करण्यात यावी.

२) अशा भूखंडाचे हस्तांतरण झाल्यानंतर महामंडळाचे प्रचिलीत धोरणानुसार २ वर्षाचा विकास कालावधी अनुज्ञेय राहील. या विकास कालावधीमध्ये हस्तांतरीत भूखंडधारकाने २० टक्के बांधकाम करणे व उत्पादनात जाणे बंधनकारक राहील.

३) उर्वरित २० टक्के चटई निर्देशकाचा वापर पुढील २ वर्षात करणे आवश्यक राहिल. दिनांक २१.०६.२०१९ च्या परिपत्रकानुसार कमीतकमी ४० टक्के चटई निर्देशकांचा वापर करणे उद्योजकास बंधनकारक राहील.

४) ज्या भूखंडाचे क्षेत्रफळ २०००० चौ.मी. पेक्षा जास्त आहे. तसेच ज्या उद्योजकांना पर्यावरण विभागाची मान्यता घ्यावी लागते असे उद्योग तसेच मेगा प्रकल्पामधील अटीचा विचार करुन हस्तांतरानंतरचा वाढीव विकास कालावधी देण्याचे अधिकारी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.



For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in
midcconsultants.in

५) उपरोक्त योजना ही एमएमआर, पीएमआर, औरंगाबाद, नाशिक व नागपूर विभागामध्ये दिर्घकालीन बंद ज्या भूखंडधारकांने अद्यापपर्यंत इमारत पूर्णत्वाचा दाखला प्राप्त केलेला नाही. तसेच भूखंडावर सद्य:स्थितीत अर्धवट बांधकाम केलेले आहे किंवा भूखंड रिकामा आहे अथवा बांधकाम पूर्ण होऊन उत्पादन बंद आहे अशा उद्योगासाठी सदरहू योजना माहे ३१ डिसेंबर, २०२१ पर्यंतच कार्यान्वीत राहील.

६) महामंडळाच्या दिनांक २७.११.२०१९ च्या परिपत्रकानुसार माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत धोरण २०१५ च्या धर्तीवर सूक्ष्म व लघू उद्योजकांना गाळे/ Flatted Gala बांधण्यास परवानगी दिल्यानंतर त्यामधील २० टक्के सहाय्यभूत सेवा अंतर्गत गाळयांचे व्यापारी प्रयोजनार्थ रुपांतरणाकरीता विनाशुल्क परवानगी देण्यात यावी.

७) ५०० कोटी गुंतवणूक करणा-या उद्योजकांना भूखंड हस्तांतरणानंतर पहिल्या २ वर्षात २० टक्के चटई निर्देशकांचा वापर करणे व उर्वरित २० टक्के चटई निर्देशांक विभागानुसार उर्वरित कालावधीमध्ये किंवा ३ वर्ष यापैकी जास्तीचा असेल त्यामध्ये करण्यात यावा. सदरहू योजना माहे ३१ डिसेंबर, २०२१ पर्यंतच कार्यान्वीत राहील.

८) ज्या भूखंडामधील हस्तांतरीत कंपनीची गुंतवणूक २५०० कोटी व त्यापेक्षा जास्त असेल तर अशा हस्तांतरण करुन घेणा-या कंपनीस भूखंड अनऔपचारीक हस्तांतरण प्रकरणात वापरलेल्या चटई निर्देशकानुसार(FSI) हस्तांतरण शुल्क १० टक्के ऐवजी ३ टक्के तसेच ३० टक्के ऐवजी १५ टक्के आकारण्यात यावे. सदरहू कंपनीने त्याच्या प्रकल्पात गुंतवणूक केल्याबाबत सनदी लेखापालचे(CA Certificate) प्रमाणपत्र घेण्यात यावे. जर हस्तांतरीत कंपनीने त्याच्या प्रकल्पात नमूद गुंतवणूक (२५०० कोटी व त्यापेक्षा जास्त) नमूद कालावधीत केली नाही तर हस्तांतरीत कंपनीस हस्तांतरामध्ये दिलेल्या सूट व्याजासह वसूल करण्यात यावी. सदरहू योजना माहे ३१ डिसेंबर, २०२१ पर्यंतच कार्यान्वीत राहील आणि कुठल्याही परिस्थितीत सदर योजनेस मुदतवाढ दिली जाणार नाही.

९) तसेच Data Center इत्यादि करीता ५०० कोटी पेक्षा जास्त गुंतवणूक आहे परंतु, भूखंडाचे क्षेत्रफळ २०००० चौ.मी. पेक्षा कमी आहे, अशा भूखंडांचे हस्तांतरणानंतरचा वाढीव विकास कालावधी देण्याचे अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील. तसेच सदरहू परिपत्रकान्वये निर्गमित योजनांचा लाभ देण्याचे/मंजूर करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**(अजित पाटील)**
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी(प्रशासन)**
**मऔविम, मुंबई.**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.



midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in